# मिरा भाईंदर महानगरपालिका

**स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.**

**दुरध्वनी क्र. 28192828/28193087.**


**जा.क्र.मनपा/आस्था/1407/2024-25** **दि. 09/08/2024**

विषय :- "हर घर तिरंगा" म्हणजेच घरोघरी तिरंगा अभियान राबविणेबाबत.

संदर्भ :- 1. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित दि.08/08/2024 रोजीच्या V.C. मधील निर्देशानुसार.
2. उपजिल्हाधिकारी (सा.प्र), जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे यांचेकडील पत्र क्र.सामान्य/क-1/टे-10/हर घर तिरंगा/कावि-908/2024, दि.08/08/2024.

**आदेश**

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरुन ठाणे जिल्हयात दि.09 ऑगस्ट, 2024 ते दि.15 ऑगस्ट, 2024 या कालावधीत "हर घर तिरंगा" म्हणजेच घरोघरी तिरंगा अभियान राबविणेबाबत मा.मुख्यमंत्री महोदयांनी दि.08/08/2024 च्या V.C. द्वारे निर्देश दिलेले आहेत. सदर अभियानांतर्गत उपरोक्त कालावधीत खालील उपक्रमांचे आयोजन करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे अधिकारी यांचेकडे कामकाज सोपविण्यात येत आहे.

| अ.क्र | दिनांक | उपक्रमाचे नाव | करावयाची कार्यवाही | अधिकाऱ्याचे नाव व पदनाम |
|---|---|---|---|---|
| 1. | दि.09/08/2024 | तिरंगा यात्रा | शालेय विद्यार्थी, युवक मंडळे, बचत गट महिला, जेष्ठ नागरिक, गावातील नागरिक यांनी तिरंगा ध्वज घेऊन यात्रेचे आयोजन करणे. (https://harghartiranga.com या संकेतस्थळावर सदरील उपक्रमाचे व्हिडीओ, फोटो त्याच दिवशी अपलोड करण्यात यावेत.) | श्री.संजय दोंदे, सहा.आयुक्त, शिक्षण विभाग |
| 2. | दि.10/08/2024 | तिरंगा रॅली | सायकल रॅली, मोटार सायकल रॅलींचे आयोजन करण्यात यावे. तसेच यामध्ये गावातील विविध मंडळे, युवा स्वयंम सेवक व नागरिकांचा उत्स्फुर्त सहभाग नोंदविण्यात यावा. (https://harghartiranga.com या संकेतस्थळावर सदरील उपक्रमाचे व्हिडीओ, फोटो त्याच दिवशी अपलोड करण्यात यावेत.) | सहा.आयुक्त, प्रभाग कार्यालय क्र.01 ते 06 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 3. | दि.11/08/2024 | तिरंगा मॅरेथॉन | राष्ट्रध्वजाचा अभिमान बाळगून मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात यावे, यामध्ये स्थानिक खेळाडून fitness influencers यांना आमंत्रित करणेत यावेत, (https://harghartiranga.com या संकेतस्थळावर सदरील उपक्रमाचे व्हिडीओ, फोटो त्याच दिवशी अपलोड करण्यात यावेत.) | श्रीम.दिपाली पोवार, समाज विकास अधिकारी, क्रीडा विभाग |
| 4. | दि.12/08/2024 | Tiranga Canvas व तिरंगा प्रतिज्ञा | 1) गजबजलेल्या ठिकाणी तिरंगा कॅन्व्हास लावावेत सदर कॅन्व्हास ची रचान राष्ट्रध्वज संहितेप्रमाणे (३:२) प्रमाणे असावी. 2) मागील वर्षी तयार करण्यात आलेल्या शिलाफलकाजवळ सामुदायिक स्वच्छता करून प्रतिज्ञा घेण्यात यावी. https://harghartiranga.com या संकेतस्थळावर सदरील कॅन्व्हासचे डिझाईन व तिरंगा प्रतिज्ञा उपलब्ध असून ते डाऊनलोड करावे तसेच फोटो त्याच दिवशी अपलोड करण्यात यावेत.) | सहा.आयुक्त, प्रभाग कार्यालय क्र.01 ते 06 |
| 5. | दि.13/08/2024 | घरोघरी तिरंगा ध्वज लावणे व तिरंगा सेल्फी काढणे | दि.13 ते 15 ऑगस्ट 2024 या कालावधीत गावातील सर्व घरांवरी शासकीय /निमशासकीय कार्यालयावर तसेच, खाजगी आस्थापनांवर तिरंगा ध्वज फडकवण्यात यावा. तसेच, तिरंगा ध्वजासोबत सेल्फी काढून उत्स्फूर्त सहभाग नोंदविण्यात यावा. (https://harghartiranga.com या संकेतस्थळावर सदरील उपक्रमाचे व्हिडीओ, फोटो त्याच दिवशी अपलोड करण्यात यावेत.) | सहा.आयुक्त, प्रभाग कार्यालय क्र.01 ते 06 |
| 6. | दि.14/08/2024 | तिरंगा ट्रिब्युट, तिरंगा मेळा व तिरंगा कॉन्सर्ट | 1) गावातील शुरवीर व स्वातंत्र्य सैनिक त्यांचे कुटूंबियांसह सन्मान व सत्कार करण्यात यावा.<br>2) कृतज्ञतेची भावना बाळगून देशभक्तीपर सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे. | श्रीम.दिपाली पोवार, समाज विकास अधिकारी, समाज विकास विभाग, |
| | | | 3) तिरंगा मेळाव्यांतर्गत कार्यक्रमाच्या ठिकाणी बचत गट तसेच स्थानिक कारागिरांचे विविध स्टॉल लावण्यात यावे. | श्रीम.चारुशिला खरपडे, महिला बाल कल्याण अधिकारी, |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | ज्यामुळे देशभक्तीचे उत्साही व उत्सवी वातावरण निर्मिती होईल. (https://harghartiranga.com या संकेतस्थळावर सदरील उपक्रमाचे व्हिडीओ, फोटो त्याच दिवशी अपलोड करण्यात यावेत.) | महिला बाल कल्याण विभाग |
| 7. | दि.15/08/2024 | | स्वातंत्र्य दिन सोहळा साजरा करणे. (https://harghartiranga.com या संकेतस्थळावर सदरील उपक्रमाचे व्हिडीओ, फोटो त्याच दिवशी अपलोड करण्यात यावेत.) | सर्व विभागप्रमुख/ खातेप्रमुख अधिकारी व कर्मचारी |

उक्त नमुद उपक्रमाच्या कार्यवाहीच्या अनुषंगाने खालील नमुद विभाग यांनी उचित कार्यवाही करावी.

| | | |
|---|---|---|
| 1. | नाविन्यता कक्ष | “हर घर तिरंगा” म्हणजेच घरोघरी तिरंगा अभियानांतर्गत दि.09/08/2024 ते दि.15/08/2024 आयोजित केलेल्या कार्यक्रमाचे फोटो, व्हिडीओ, सेल्फी त्याच दिवशी https://harghartiranga.com संकेतस्थळावर जास्तीत जास्त अपलोड करुन त्याबाबतचा दैनंदिन अहवाल जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे या कार्यालयास सादर करावा. |
| 2. | आस्थापना विभाग | आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व घरे, शासकीय/निमशासकीय कार्यालये, संस्था, आस्थापना प्रतिष्ठाने यांची संख्या विचारात घेऊन तिरंगा ध्वजाची खरेदी करणे व वितरण करणे तसेच आपल्या कार्यालयातून वितरित करण्यात आलेल्या एकुण तिरंगा ध्वजाची आकडेवारी जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे यांना कळविण्यात यावे. |
| 3. | जनसंपर्क विभाग | सदर अभियानाबाबत प्रचार व प्रसिध्दी करण्यात यावी. |

आदेशात नमुद अधिकारी यांनी उपरोक्त सूचनांची तंतोतंत अंमलबजावणी करण्याची दक्षता घ्यावी.

(रवि पवार)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत माहितीस्तव -

1. मा.आयुक्त महोदय
2. मा.अतिरिक्त आयुक्त (1 व 2)
3. उप-आयुक्त सर्व
4. विभागप्रमुख/खातेप्रमुख सर्व